## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**
**द्वितीय अपील क्रमांक :- १७५२/२०१९/नाशिक मधील शास्तीचे प्रकरण**

१ श्री. अब्दल सलाम अब्दुल अजीज, : अपिलार्थी
रा.हकीम नगर, गली नं.१०, स.नं.२१५/१,
प्लॉट नं.६७, नयापुरा वार्ड, मालेगांव,
ता.मालेगांव, जि.नाशिक.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
उप शिक्षणाधिकारी(प्राथमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक,
ता.जि.नाशिक. होलीफ्लॉवर.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी(प्राथमिक),
जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक,
ता.जि.नाशिक.

**(खुलासा सुनावणी दिनांक - ०१/०८/२०२३)**

**विवेचन**

अपिलार्थी यांनी दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या माहिती अर्जान्वये, खालीलप्रमाणे माहिती मिळण्याची विनंती केली होती.

"उपलब्ध माहितीनुसार ते दिनांक ११/०२/२०१९ या कालावधीतील १.मुद्दस्सिर नजर प्रायमरी स्कुल, शैदा एज्युकेशन फाउंडेशन संचलित सर्वे नंबर ६५/३, प्लॉट नंबर ५/६ गल्ली नंबर-१, निशात नगर आयेशानगर, मालेगांव या विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, सफाई कर्मचारी व सर्व कर्मचारी यांचे नावाची यादी, पद व संवर्ग यांची संपूर्ण खरी नक्कल. २. संबंधित मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी , सफाई कर्मचारी व सर्व कर्मचारी यांना सेवेत कायम केले त्यांचे आदेश क्रमांक व दिनांकासह यादी."

२) त्यानुषंगाने दाखल उपरोक्त द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक ०७/१२/२०२० रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

१.तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक (सारासे वर्ग-२), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.सुधीर पगार यांनी अपिलार्थी यांच्या दिनांक ११/०२/२०१९ रोजीच्या माहिती अर्ज मुख्याध्यापक यांचेकडे वर्ग न करता प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ महानगरपालिका, मालेगांव यांचेकडे वर्ग केला व

अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवले. म्हणून श्री. पगार यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे तात्काळ सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

२.तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.राजीव म्हसकर यांनी अपिलार्थी यांनी दिनांक २०/०३/२०१९ अन्वये दाखल केलेल्या प्रथम अपिलाची सुनावणी घेऊन निर्णय पारित केला नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन परिपत्रक केंमाअ-२००७/७४/ प्र.क्र.१५४/०७/०६, याबाबतचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाकडे तात्काळ सादर करावा. सदर मुदतीत लेखी खुलासा प्राप्त न झाल्यास त्यांचे प्रस्तुत प्रकरणी काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शासन परिपत्रक दि.३१/०३/२००८ नुसार शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्याबाबतचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३) उपरोक्त आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांकडून मागविण्यात आलेल्या खुलाशाच्या अनुषंगाने आयोजित केलेल्या सुनावणीसाठी- जन माहिती अधिकारी उपस्थित होते. आणि प्रथम अपिल अधिकारी अनुपस्थित होते.

४) सदर आदेशास अनुसरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.सुधीर पगार, यांनी आयोगाकडे दिनांक-०१/०८/२०२३ रोजीच्या पत्रान्वये लेखी खुलासा सादर करुन असे नमूद केले आहे की, सदर माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याने अपिलार्थीस माहिती मिळावी या सद्हेतुने सदरचा अर्ज प्रशासन अधिकारी, शिक्षण मंडळ, मालेगांव महानगर पालिका यांचेकडे वर्ग करण्यात आला होता. यामध्ये अर्जदारास माहिती न देणे किंवा टाळाटाळ करणे असा कोणताही हेतु नव्हता व नाही. दिनांक ०७/१२/२०२० रोजी झालेल्या द्वितीय अपिल सुनावणीत सदर माहिती जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मुद्दशीर नजर प्रायमरी स्कुल, निशातनगर, आयशा नगर, मालेगाव यांना नोंदणीकृत डाकेने पुरविण्याचे आदेश दिलेले आहेत. यास्तव अपिलार्थीस माहिती न देणे अथवा टाळाटाळ करणे किंवा अर्ज चुकीचे पध्दतीने वर्ग करणे असा कोणताही हेतु नसल्याने माझा खुलासा मान्य करावा अशी विनंती केली आहे.

तसेच त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(प्राथमिक), जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, यांचे दि.१२/०२/२०२१ चे पत्र सादर केले असून त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मी शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद नाशिक येथे दि.१४/०८/२०२० रोजी शिक्षणाधिकारी पदावर हजर झालेलो असून दि.१९/१२/२०१७ ते दि.१०/०८/२०२० या कालावधीत डॉ.वैशाली द. झनकर वीर ह्या शिक्षणाधिकारी पदावर कार्यरत होत्या.आपणाकडील संदर्भिय १ ते ३ चे आदेशात तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद कार्यालय नाशिक, श्री.राजीव म्हसकर असे नमूद केले आहे तथापि सदर कालावधीत मी शिक्षणाधिकारी या पदावर कार्यरत नव्हतो.

५) प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षण विभाग(माध्यमिक) जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.सुधीर पगार, यांनी माहिती पुरविण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे दिसून येत नाही. त्यानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा समर्थनीय आहे. म्हणून त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

६) शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.राजीव म्हसकर, हे तत्कालीन कालावधीत प्रथम अपिल अधिकारी या पदावर कार्यरत नसल्याने त्यांचेविरुध्द कार्यवाही करण्याची आवश्यकता नाही.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षण विभाग,(माध्यमिक) जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.सुधीर पगार, यांनी केलेला खुलासा समाधानकारक असल्याने मान्य करण्यात येऊन प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

२) शिक्षणाधिकारी(प्राथमिक) जिल्हा परिषद कार्यालय, नाशिक, श्री.राजीव म्हसकर, हे प्रथम अपिल अधिकारी या पदावर कार्यरत नसल्याने त्यांचे विरुध्द प्रस्तावित शास्तीची कार्यवाही रद्द करण्यात येत आहे.

३) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक

राज्य माहिती आयोग खंडपीठ नाशिक

जावक क्र. ३नो-८७३ 26 APR 2024